साप्ताहिक
RNI No. : MAHMAR2009/28514 www.samajsatta.com
# समाज सत्ता
www.samajsatta.com
Mo. : 9049940157
वर्षे १६ वे | अंक ४१ | पुणे, सोमवार, दि. १५ जून ते २१ जून २०२६ | मुल्य : २ रु | पान ४

## थेऊर गावातील प्रमुख रस्त्यांवर सुरक्षिततेसाठी गतिरोधकांची उभारणी - सभापती युवराज काकडे

**उरुळी कांचन: प्रतिनिधी ( सुनील तुपे )**

**थेऊर (प्रतिनिधी):** थेऊर गावातील नागरिक, विद्यार्थी तसेच श्री चिंतामणी मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांच्या माध्यमातून गावातील प्रमुख रस्त्यांवर सहा ठिकाणी नवीन गतिरोधकांची उभारणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे वाहनांच्या वाढत्या वेगावर नियंत्रण येण्यास मदत होणार असून अपघातांची शक्यता कमी होणार आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून गावातील नागरिकांकडून शाळा परिसर, मंदिर परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत चिंतामणी विद्या मंदिराजवळ तसेच श्री चिंतामणी मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख तीन मार्गांवर गतिरोधक बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

थेऊर हे अष्टविनायकांपैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने येथे वर्षभर भाविकांची मोठी गर्दी असते. त्याचबरोबर शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक नागरिकांचीही मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर वाहनांचा वेग नियंत्रित ठेवणे आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक



होते. नव्याने बसविण्यात आलेले गतिरोधक या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

याबाबत बोलताना सभापती युवराज काकडे यांनी सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. गावातील शाळा, मंदिर आणि गर्दीच्या भागांमध्ये सुरक्षित वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. वाहनचालकांनीही गतिरोधकांजवळ वेग कमी करून जबाबदारीने वाहन चालवावे.

या कामामुळे थेऊर गावातील वाहतूक अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार असून नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे. गावाच्या विकासाबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेलाही प्राधान्य देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवारांची राष्ट्रवादी सैनिक सेलच्या शिष्टमंडळाशी विविध मागण्या संदर्भात भेट

- **उपमुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष दिपकराजे शिर्के यांच्यात सकारात्मक चर्चा**

**मुंबई :** मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची महाराणी येसुबाईंच्या माहेरकडील राजेशिर्के घराण्याचे वंशज तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष दिपकराजे शिर्के यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेट घेत विविध सामाजिक, राजकीय व माजी सैनिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

दि. १६ जून २०२६ रोजी झालेल्या या बैठकीत राष्ट्रवादी माजी सैनिक सेलच्या वतीने विविध मागण्यांचे लेखी निवेदन उपमुख्यमंत्री सुनेत्राताईंना सादर करण्यात आले. तसेच चर्चे दरम्यान पक्ष संघटन



बांधणी, राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडी, शेतकरी कर्जमाफी, सामाजिक व ऐतिहासिक विषयावर तसेच आजी-माजी सैनिक, पोलीस व संरक्षण क्षेत्राशी संबंधित माजी कर्मचाऱ्यांच्या विविध अडचणी, समस्या व प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. बैठकी दरम्यान महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना अधिक प्राधान्य देणे, त्यांच्यासाठी अतिरिक्त पदांना मंजुरी देणे तसेच सैनिक कल्याणाशी संबंधित विविध मागण्यांवर विशेष भर देण्यात आला. सैनिकांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे सोडविण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी राज्यातील कष्टकरी शेतकरी, माजी सैनिक आणि देशसेवेसाठी योगदान देणाऱ्या सर्व घटकांच्या सन्मान व हक्कांसाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. सैनिकांच्या विविध प्रश्नांबाबत नक्कीच सकारात्मक भूमिका घेऊन आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवारांनी दिले. यासंगी राजेशिर्के घराण्याचे वंशज राष्ट्रवादी माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष शंभुसेना प्रमुख दिपकराजे शिर्के, प्रदेश उपाध्यक्ष श्रीमंत राठोड, प्रदेश संपर्क प्रमुख चंद्रकांत गायकवाड, माजी सैनिक चंद्रकांत ढेंबरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी सैनिक आणि मान्यवर उपस्थित होते.

## खताचा काळाबाजार आणि साठेबाजीवर कृषी विभागाची मोठी कारवाई ; ११३ परवान्यांवर कारवाई, ७ गुन्हे दाखल

**पुणे :** शेतकऱ्यांना दर्जेदार आणि रास्त दरात खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागामार्फत पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये खत विक्री केंद्रांची कडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. एप्रिल २०२६ पर्यंत विभागात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत १०७ खत विक्री परवाने निलंबित आणि ६ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत, तर ७ केंद्रांवर गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली आहे. या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात एकूण २ हजार ५७६ परवानाधारक केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान २८१ प्रकरणांमध्ये काळाबाजार झाल्याचे समोर आले असून, २७७ केंद्रांना 'कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातील ६५० केंद्रांची तपासणी करण्यात आली. यापैकी ७१ प्रकरणांत अनियमितता आढळली असून २७ परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

## उरुळी कांचनच्या कचरा-मुक्त भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल; घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या जागेबाबत सकारात्मक निर्णय, जागतिक रक्तदान दिनी ८०६ रक्तदात्यांचा सहभाग

**उरुळी कांचन :** ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनच्या वतीने जागतिक रक्तदान दिनानिमित्त बी. जी. शिर्के प्राथमिक शाळा, उरुळी कांचन येथे आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबीर आणि पर्यावरणपूरक प्लास्टिक बँक या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमात उरुळी कांचनच्या बहुप्रतिक्षित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आवश्यक जागेबाबत सकारात्मक निर्णय झाल्याने कचरा-मुक्त उरुळी कांचन या स्वप्नाच्या पूर्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले.

कार्यक्रमात बोलताना जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष श्री. विरधवल (बाबा) जगदाळे आणि मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील यांनी उरुळी कांचनसाठी प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करत, हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रशासनाच्या स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ग्रामदूतांनी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महात्मा गांधी सर्वोदय संघाचे उपाध्यक्ष श्री. के. डी. (बापू) कांचन यांनी प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास आपण कटिबद्ध असल्याचे सांगत, त्यासंदर्भातील आवश्यक औपचारिकता अल्पावधीत पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नाला सकारात्मक दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'प्लास्टिक बँक' या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन. गावातील नागरिकांनी घरातील स्वच्छ व वर्गीकृत प्लास्टिक कचरा प्लास्टिक बँकेत जमा करायचा असून, त्याबदल्यात प्रोत्साहनपर मोबदला दिला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत गृहिणींना एक किलो स्वच्छ प्लास्टिकच्या मोबदल्यात



एक किलो साखर देण्यात येणार आहे, तर शालेय विद्यार्थ्यांना एक किलो प्लास्टिकच्या बदल्यात वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स यांसारख्या शालेय उपयोगाच्या वस्तू देण्यात येणार आहेत. पर्यावरण संवर्धनाबरोबरच नागरिकांमध्ये कचरा व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे संस्कार रुजविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

जागतिक रक्तदान दिनानिमित्त आयोजित या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल ८०६ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. या रक्तदान शिबिरात ससून रक्तपेढी, तर्पण ब्लड बँक, स्पंदन ब्लड बँक आणि अक्षय ब्लड बँक यांनी सहभाग नोंदवून रक्तसंकलनाचे कार्य केले.

यावेळी ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनच्या कार्याचा आढावा सादर करण्यात आला. संस्थेने सन २०२० पासून आयोजित केलेले हे सलग तेरावे रक्तदान शिबीर असून, आजवर महाराष्ट्रातील १३५० हून अधिक गरजू रुग्णांना रक्तपुरवठा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच शिंदवणे घाट आणि परिसरातील गावांमध्ये १३,००० हून अधिक वृक्षांची लागवड करून त्यापैकी सुमारे ८७ टक्के वृक्षांचे यशस्वी संवर्धन करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास श्री. जितेंद्र बडेकर (सभापती, समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद पुणे), श्री. शेखर शेलार (गटविकास अधिकारी, पंचायत समिती हवेली), श्री. मिलिंद जगताप (प्रशासक-सरपंच, उरुळी कांचन ग्रामपंचायत), श्री. राजाराम कांचन (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे), श्री. सागर रघुनाथ शेलार (सदस्य, शिक्षण समिती, जिल्हा परिषद पुणे), श्री. राजन जांभळे (सचिव, पर्यावरण जागर समिती), श्री. महादेव तुकाराम कांचन (आदर्श जिल्हा परिषद सदस्य), श्री. देविदासजी भन्साळी (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी), श्री. सुदर्शन चौधरी (सदस्य, पंचायत समिती हवेली), सौ. कोमल कांबळे (सदस्य, पंचायत समिती हवेली), श्री. संतोष आबासाहेब कांचन (माजी सदस्य, नियोजन समिती) श्री. संतोष हरीभाऊ कांचन (माजी सरपंच) श्री. युवराज कांचन ( माजी उपसरपंच, उरुळी कांचन) श्री. मनोहर कांचन,(विश्वस्त, महत्मा गांधी सर्वादय संघ) श्री, राजेंद्र टिळेकर (विश्वस्त, महत्मा गांधी सर्वादय संघ) श्री. सुभाष लोणकर (माजी सरपंच, टीळेकरवाडी) तसेच ज्येष्ठ पत्रकार श्री. सुनिल जगताप आणि त्यांचे परिसरातील सहकारी यांच्यासह महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित सर्व शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, विविध क्षेत्रांतील मान्यवर, रक्तदाते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनचे ग्रामदूत, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या उभारणीसंदर्भात सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याने 'कचरा-मुक्त उरुळी कांचन' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी एक महत्त्वाचा टप्पा पार पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्र संचालन ऋषीकेश भालेराव, प्रास्तविक संतोष चौधरी तर आभार प्रदर्शन मंदार खरात यांनी केले.

समाजसत्ता
■ वर्षे १६ वे ■ अंक ४१ ■ पुणे, सोमवार, दि. १५ जून ते २१ जून २०२६


## संपादकीय

# ...ऑपरेशन होणार !

ऑपरेशन टायगर..! उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या ऑपरेश सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला किंवा शिवसेना शिंदे सेनेमध्ये प्रवेश केला. त्या खासदारांमध्ये वाशिमचे खासदार संजय देशमुख, परभणीचे खासदार संजय जाधव, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, शिर्डीचे भाऊसाहेब वाकचौरे, मुंबईचे संजय दिना पाटील, हिंगोलीचे नागेश पाटील अष्टीकर यांचा समावेश आहे. या सर्वांनी मिळून संसदेत स्वतंत्र गट स्थापन करण्याबाबत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना पत्र दिल्याचे कळते. ओमराजे निंबाळकर हे नाईलाजास्तव त्यांच्या वडिलांच्या हत्येचा निकाल कोर्टात प्रलंबित आहे. तो निकाल त्यांच्या बाजूने लावून देण्यासंदर्भात त्यांना गळ घातली आहे, असे समजते. या सहा खासदारांपैकी एकाला राज्यमंत्री करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे देखील सांगण्यात येते. त्यामुळे एकदाचे ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचे देखील कळते. उद्धव ठाकरेंना मात्र हा फार मोठा धक्का म्हणावा लागेल. यामध्ये पैशाचाही मोठा घोडेबाजार झाल्याचे सांगण्यात येते. प्रत्येक खासदाराला ५० कोटी रुपये देण्याचे कबूल करण्यात आले आहे. आणि त्यापैकी आता पंधरा कोटी रुपये दिले आहेत. आणि उर्वरित रक्कम लवकरच देण्यात येणार असल्याचे देखील सांगण्यात येते किंवा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी हा दावा केला आहे. एकंदरीत पैशाच्या जोरावर जर खासदार फुटत असतील तर या इतकी वाईट गोष्ट कोणतीच नाही. कुणाला मंत्रिपद हवे आहे! कुणाला पैसे हवे आहेत ! एकंदरीत पैशाचा जोर काय काम करतो हे दिसून येते आहे. अलीकडे राजकारणात काही तत्वे राहिलेली नाहीत. पक्ष बदलण्याच्या गोष्टी होत असतात. त्यातलाच हा प्रकार नव्हे काय ? धाराशिवचे आमदार ओमराजे निंबाळकर हे म्हणायचे माझी छाती फाडली तर त्यात बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे तुम्हाला दिसतील, इतका मी त्यांच्याशी एकनिष्ठ पाईक आहे. पण त्या ओमराजे निंबाळकरांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडून दिली. दुसऱ्या शिवसेनेत प्रवेश केला. आता या मंडळींना मतदार संघात काय स्थान मिळेल हे सांगता येत नाही. धाराशिवमध्ये मतदार फार चिडले आहेत. 'ते जर मतदार संघात आले तर त्यांच्या गाडीसह त्यांना आम्ही जाळून टाकू', एवढ्या तीव्र शब्दात मतदार बोलत आहेत. मतदारांचा राग सहाजिक आहे. त्यांच्या मनाला येईल तेव्हा तुम्ही पक्ष बदल करता. पक्ष बदलायचा असेल तर तुम्ही आधीच पक्षाचा राजीनामा द्या, मगच पक्ष सोडा. त्यानंतर तुम्ही कुठल्याही पक्षात जाऊ शकता. निंबाळकरांना आता चांगले वाटत असेल, पण पुढच्या निवडणुकीत त्यांना मतदार धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत, हेही तितकेच खरे आहे. काही झाले तरी चालेल पण मी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना सोडणार नाही, असे म्हणणारे निंबाळकर कोणत्या थराला गेले आहेत ? हे कळत नाही. आता कायदेशीर लढायला सुरुवात झाली आहे. उद्या संसदीय पक्षाच्या बैठकीसाठी सर्व खासदार उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून व्हीप काढण्यात आले आहे. हे व्हीप किती जण स्वीकारतात हे पाहावे लागेल. परंतु हा व्हीप वगैरे गोष्टी तकलादू आहेत. कायद्याच्या अनेक पळवाटा आहेत. त्यामुळे हे फुटलेले खासदार सही सलामत सुटू शकतात. आजच उज्वल निकम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हे खासदार अपात्रतेपासून सुटू शकतात. त्यांच्याकडे वकिलांची मोठी फौज असते आणि त्याच बरोबरीत सत्ताधारी भाजप त्यांना साथ देत आहे. त्यामुळे त्यांचे काहीही होणार नाही. त्यांना फक्त भीती आहे ती निवडणुकीत निवडून येण्याची. त्यांना मतदार हेच धडा शिकवतील आणि त्यांना घरी बसतील हे मात्र निश्चित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीतही त्याचा अनुभव आला. अपक्ष उमेदवार अनिल चौधरी हे सुरुवातीपासूनच मोठा जोश दाखवत होते. मीच निवडून येणार.. माझा पहिला पूर्ण प्रचार दौरा संपला आहे.. त्यात भाजप सह सेनेचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवाराचा मला पाठिंबा मिळत असल्याचा डंका त्यांनी वाजवला.. मला कुणाचा दबाव नाही.. मी कुणाला घाबरणार नाही.. माझी उमेदवारी शेवटपर्यंत कायम राहील... असे त्यांनी सांगितले आणि सुरुवातीला १०९ नगरसेवकांची बैठक भुसावळला पार पडली. त्यात या १०९ सदस्यांनी मला पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे माझा उत्साह वाढला आहे. म्हणून मी माझी उमेदवारी कायम ठेवत आहे, असे सांगितले आणि मतदानाच्या पूर्वसंध्येला त्यांनी मी माघार घेत असल्याच्या गौप्यस्फोट केला. त्यांनी सांगितले की, मला आमदार बच्चू कडू यांचा फोन आला होता. पाचोराचे आमदार किशोर आप्पा पाटील यांचाही फोन आला होता. त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांचाही फोन आला होता. उपमुख्यमंत्री शिंदे यांचा फोन आल्यानंतर त्यांचा आशीर्वाद घेऊन मी माझी उमेदवारी मागे घेतली आणि महायुतीचे उमेदवार नंदकुमार महाजन यांना माझा पाठिंबा जाहीर केला. या माघारीला आपण काय म्हणावे ? यात पैशाची फार मोठी डील झाली असे सांगण्यात येते आणि झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. पैशाशिवाय कोणी असे करणार नाही. आशीर्वाद वगैरे बोलण्यासाठी ठीक आहे. पण जो खर्च केला आहे, तो खर्च काढल्याशिवाय हे थांबणार नाही काय ? अनिल चौधरींची ऐनवेळी माघार म्हणजे फार मोठा घोडेबाजार झाला असला पाहिजे, असे म्हणतात आणि हे बरोबर देखील आहे. दुसरे अनिल चौधरी यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर एखादे पद त्यांना मिळण्याची दाट शक्यता आहे. पण विश्वासार्हतेचे काय ? हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहतो...!

# निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने भक्कम वाटचाल

'अल निनो' हा शब्द महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे.अल निनो हे एक वातावरणीय संकट असून आता या संकटाच्या आम्ही जवळ असून याचा सर्वाधिक परिणाम जून मध्ये मृग आणि रोहिणी नक्षत्रावर झाला आहे. तो पुढेही होऊ शकतो. त्यामुळे या लेखात, चला ! अल निनो या वातावरणातील बदलाच्या संकटाला सोप्या भाषेत समजून घेऊया ! राज्यातील शेतकऱ्यांनी हे बदल समजून घेऊन हवामान व कृषी खात्याच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांनी देखील या संदर्भात पुढील काळाचे नियोजन करणे आवश्यक आहे. चला ! सोप्या भाषेत हा विषय समजून घेऊया !

हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांमध्ये अल निनो ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना विशेष महत्त्वाची मानली जाते. जागतिक हवामान संघटना, भारत हवामान विभाग, संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार अल निनोचा प्रभाव केवळ हवामानापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम शेती, जलसंपदा, पशुधन, आरोग्य, जैवविविधता आणि अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या घटनेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यासाठी पूर्वतयारी करणे अत्यंत आवश्यक आहे.

### अल निनो म्हणजे काय?

अल निनो हा स्पॅनिश शब्द असून त्याचा अर्थ लहान मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अल निनो स्थिती निर्माण होते. ही घटना ENSO या जागतिक हवामान प्रणालीचा भाग आहे.

आता हे कसे होते हे जाणून घेऊया ! समुद्रातील तापमानातील या बदलांमुळे जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. त्यामुळे काही भागात दुष्काळ, तर काही भागात अतिवृष्टीसारख्या घटना घडू शकतात.

### अल निनो दरवर्षी येतो का?

नाही. जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार अल निनो साधारणतः दर दोन ते सात वर्षांनी उद्भवतो. त्याचा कालावधी साधारण नऊ महिने ते एक वर्ष किंवा काही वेळा त्याहून अधिक असू शकतो. प्रत्येक अल निनोची तीव्रता आणि परिणाम सारखेच असतील असे नाही.

### भारतावर यापूर्वी काय परिणाम झाला?

भारतातील शेतकरी, पर्यावरण तज्ञ, जलतज्ञ, वनतज्ञ, कृषी तज्ञांसाठी अल निनो हा शब्द आता अपरिचित राहिलेला नाही. भारतातील मान्सून आणि अल निनो यांचा संबंध अनेक दशकांपासून अभ्यासला जात आहे. १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये भारताने कमी पावसाचा अनुभव घेतला होता. विशेषतः २००२ आणि २००९ मध्ये देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गेल्या वर्षी जसा तुफान पाऊस झाला किंवा त्या वर्षापूर्वीही जसा पूरक पाऊस झाला तसा पाऊस यावर्षी नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

तथापि, हवामान तज्ञ स्पष्ट करतात की प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. भारतीय महासागरातील तापमान, अरबी समुद्रातील स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे आणि इतर हवामान घटकही मान्सूनवर प्रभाव टाकतात.

### हवामान तज्ञांचे काय मत आहे?

जागतिक हवामान संघटना, भारत हवामान विभाग, संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना आणि इतर संशोधन संस्थांच्या मते अल निनो हा जागतिक हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक भाग आहे. मात्र जागतिक तापमानवाढीमुळे त्याचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हवामान तज्ञांच्या मते, अल निनोमुळे जागतिक सरासरी तापमान वाढू शकते. उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढू शकते. काही भागात दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत पेरणीच्या नियोजनासाठी हवामान अंदाजांचे महत्त्व अधिक वाढते.

### 'अल निनो 'परिणाम रोखण्यासाठी प्रयत्न

अल निनो ही नैसर्गिक महासागरीय घटना आहे, त्यामुळे यावर्षी अनेक बाबतीत अनियमितता घडू शकते. अशा परिस्थितीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साधारणतः अशावेळी शासन स्तरावर हवामानाचा सतत अभ्यास आणि पूर्वसूचना प्रणाली विकसित व कार्यक्षम केली जाते, जलसंधारण प्रकल्प राखीव ठेवले जातात. पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे सुचविले जाते. दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तयार केले जातात, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते, हवामान आधारित कृषी सल्ला सेवा दिली जाते, बियाणे व चारा उपलब्धतेचे नियोजन करणे, जलाशय व्यवस्थापन आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या काळात शासनामार्फत केले जाते.

### शेतकऱ्यांनी काय करावे

शासन स्तरावर हे सर्व निर्णय घेतले जात असताना आपल्या शेतकऱ्यांनी या परिस्थितीत काय करावे यासंदर्भात कृषी तज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. कृषी तज्ञांच्या मते अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**१. हवामान अंदाजांवर लक्ष ठेवावे**

भारत हवामान विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

**२. पीक निवडीचे नियोजन करावे**

कमी कालावधीत येणारी आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके निवडण्याचा विचार करावा.

**३. जलसंधारणाला प्राधान्य द्यावे**

शेततळे, बांधबंदिस्ती, पावसाचे पाणी साठवणे, चर निर्माण करणे, शेत व शेत रस्त्याच्या मध्ये पाणी साठवणे, ओलसरपणा राहिली, मूलस्थानी जलसंधारणासाठी प्रयत्न करणे.

**४. उपलब्ध जलस्तोत्रातून फक्त सूक्ष्म, ठिबक आणि तुषार सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.**

**५. पीक विमा घ्यावा**

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी हे सर्वात आवश्यक आहे.

**६. पशुधन व्यवस्थापन**

चारा आणि पाण्याची उपलब्धता याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे.

**७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी विभागाने सांगितल्याशिवाय पेरणी न करणे कारण या परिस्थितीत दुबार, तिबार पेरणीची शक्यता असते.**

### सामान्य नागरिकांनी काय करावे?

अल निनोचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच होतो असे नाही. तर या वातावरणाच्या बदलातून सर्वसामान्य प्रत्येक नागरिकाला जावे लागणार आहे. त्यामुळे हा अल निनो काय हे प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी अशा परिस्थितीत, पाण्याची बचत करावी,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करावे. स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करावे. उष्णतेच्या लाटांपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा.

### कोणत्या देशांवर अल निनोचा प्रभाव ?

अल निनोचा प्रभाव जागतिक स्वरूपाचा असतो. विशेषतः खालील देश यावर्षी अधिक प्रभावित होणार आहे. यामध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिकेतील काही देश, फिलिपाईन्स, पॅसिफिक महासागरातील बेट राष्ट्रे यांच्यावर अधिक संकट कोसळू शकते. काही भागात दुष्काळ, काही भागात पूर आणि काही ठिकाणी समुद्री परिसंस्थांवर परिणाम दिसून येतो.

### भारतातील कोणती राज्ये अधिक संवेदनशील?

अल निनोच्या काळात पावसातील तफावत सर्वाधिक जाणवणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांचा उल्लेख केला जातो. तथापि, प्रत्येक वर्षी परिस्थिती वेगळी असू शकते. त्यामुळे या प्रदेशावर अधिक लक्ष भारतीय हवामान खात्याने केले असून त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

### मृग बरसला नाही म्हणजे अल निनोचा प्रभाव

हे उत्तर सध्या नाही असे आहे. कारण भारतात अनेक वेळा उशिरा पावसाला सुरुवात होते. भारतीय हवामान विभागाच्या मते मान्सूनचे आगमन आणि त्यातील खंड अनेक घटकांवर अवलंबून असतात. अरबी समुद्रातील परिस्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे, पश्चिमी वारे, स्थानिक तापमान आणि इतर महासागरीय घटक यांचाही प्रभाव असतो.

म्हणूनच जून महिन्यात काही दिवस पाऊस उशिरा येणे किंवा खंड पडणे यामागे केवळ 'अल निनो 'च कारणीभूत आहे, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. तथापि यासंदर्भात हवामान शास्त्रज्ञांनी यावर्षी पाऊस उशिरा होईल अशी सूचना केली आहे. 'अल निनो ' च्या प्रभावाबाबत काही कालावधीनंतर हवामान खाते मत व्यक्त करणार आहे तथापि,पाऊस उशिरा येणार हे निश्चित.त्यामुळे,अधिकृत हवामान विभागाच्या निरीक्षणांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

### शासनाच्या काय उपाय योजना सुरू आहे

महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार, जलसंधारण प्रकल्प, सूक्ष्म सिंचन प्रोत्साहन, पीक विमा, हवामान आधारित कृषी सल्ला आणि दुष्काळ व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजनांवर भर दिला आहे. शासन सातत्याने हवामान परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राज्य शासनाने संभाव्य जल संकटामुळे धरणातील पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्याची महत्त्वाची सूचना केली आहे. सिंचनासाठी पाणी उपसा बंदी लागू केली आहे. धरणातून कालव्यातून नद्या आणि तलावांमधून होणाऱ्या अधिक अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने बंद करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येणार आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना सूचना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात हवामान विभाग व राज्याच्या व केंद्राच्या कृषी विभागाशी सल्लामसलत करून शेतकऱ्यांसाठी पेरणीची घाई न करण्याच्या संदेश दिला आहे. अल निनो मुळे पावसात खंड पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, कृषी विभागाच्या सल्ल्यानेच पेरणी करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता अधिकृत हवामान अंदाज, कृषी विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि कृषी विभागाच्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

थोडक्यात,अल निनो ही जगभर परिणाम घडवणारी नैसर्गिक हवामान घटना असली तरी ती अटळ संकट नाही. विज्ञानाधारित नियोजन, अचूक हवामान अंदाज, जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासन-जनसहभाग यांच्या मदतीने तिच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शासनाकडून होणाऱ्या वेळोवेळी सूचना भीती निर्माण करण्यासाठी नाहीत. तर जागरूकता वाढविण्याची आहे. शाश्वत जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि हवामान अनुकूल शेती हीच अल निनोसारख्या आव्हानांना सामोरे जाण्याची सर्वात प्रभावी दिशा ठरू शकते. त्यामुळे शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी कृषी विभागाच्या व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी त्यासाठी सतर्क असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

मराठी साप्ताहिक समाज सत्ता के मुद्रक : राजेश सुकलाल धिवर तथा प्रकाशक : राजेश सुकलाल धिवर द्वारा के पक्ष में श्री समर्थ प्रिंटर्स, आप्पा बळवंत चौक, प्रभात थिएटर के पास, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र से मुद्रित तथा बी-२१/५०३, सेक्टर १२, प्लॉट नं. बी-१, पी.एम.आर.डी.ए., भोसरी, पिंपरी चिंचवड कार्पोरेशन, ता. हवेली, जि. पुणे ४११०१८ महाराष्ट्र से प्रकाशित, संपादक राजेश सुकलाल धिवर
Mob.: 9049940157 E-Mail- samajsattagmail.com, RNI NO. M-HM-R/2009/28514 (सर्व वादविवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)

समाजसत्ता
३
# पिंपरी - चिंचवड परिसर
■ वर्षे १६ वे ■ अंक ४१ ■ पुणे, सोमवार, दि. १५ जून ते २१ जून २०२६





# पाणी बचतीसाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा - आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

■ **अल निनोच्या परिणामामुळे पावसाला विलंब; पाण्याचा अपव्यय टाळून पावसाचे पाणी साठवण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याचे आवाहन**

**पिंपरी :** शहरातील जलस्रोतांवरील वाढता ताण आणि यंदा अल निनोच्या परिणामामुळे मान्सूनला होत असलेला विलंब लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करून पाणी बचतीसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत नागरिकांना पाणी बचतीसंदर्भात विविध उपाययोजनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी वाहन धुण्याचे टाळावे. व्यावसायिक वाहन धुलाई केंद्रांनी पाण्याचा पुनर्वापर करणाऱ्या यंत्रणांचा वापर करावा. तसेच खासगी व सार्वजनिक स्विमिंग पूलमध्ये नवीन पाणी भरणे शक्यतो टाळावे.

घरगुती तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये फ्लश टँक, नळ, पाईपलाईन आणि इतर जलवाहिन्यांमधील गळती तात्काळ दुरुस्त करावी. पाण्याचा वापर कमी करण्यासाठी सर्व नळांना एरेटर्स बसविण्याचा आग्रह करण्यात आला आहे. पाणी वापरातील कार्यक्षमता वाढविणाऱ्या उपकरणांचा वापर करण्यास प्राधान्य द्यावे.

शहरातील उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर आणि पाण्याची दीर्घकालीन उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक स्तरावर पाणी बचतीची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. नागरिकांनी घरगुती पातळीवर गळती रोखणे, एरेटर्सचा वापर करणे, वाहन धुण्यासाठी नळाचे पाणी टाळणे तसेच पावसाचे पाणी साठवण यंत्रणा कार्यान्वित ठेवणे, या उपाययोजनांचा अवलंब करावा. नागरिकांच्या सहकार्यामुळेच शहराची जलसुरक्षा अधिक मजबूत होईल, असे मत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी व्यक्त केले

---

## पुरंदर विमानतळ प्रकल्पग्रस्तांसाठी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता विशेष कॅम्प; न्यायिक, अर्धन्यायिक व महसुली प्रकरणांचा जागेवर निपटारा

■ **जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष उपक्रम; ७५ टक्के शेतकऱ्यांचे प्रतिज्ञापत्र सादर, जवळपास एक हजार कोटी रुपयांचे वाटप**

**पुणे :** प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पुरंदर) प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या महसुली, न्यायिक आणि अर्धन्यायिक स्वरूपाच्या प्रलंबित अडचणी सोडविण्यासाठी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता सासवड प्रांत कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

या कॅम्पमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जागेवरच निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांनी प्रतिज्ञापत्रे (ॲफिडेव्हिट) सादर केली असून जवळपास एक हजार कोटी रुपयांचा मोबदल्याचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांपर्यंत मोबदल्याची रक्कम तातडीने पोहोचावी, यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, अनेक प्रकरणांमध्ये वारस नोंदी, फेरफार मंजुरी, सातबारा उताऱ्यातील त्रुटी, नाव दुरुस्ती, हक्कसोडपत्र, संयुक्त मालकीचे प्रश्न, मयत खातेदारांच्या नोंदी, मालकी हक्क पडताळणी, मूल्यांकनावरील हरकती, न्यायालयीन दावे तसेच विविध अर्धन्यायिक प्रकरणांमुळे मोबदला वितरणात अडथळे निर्माण होत आहेत.

या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी महसूल, भूमी अभिलेख, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी कॅम्पमध्ये उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध कार्यालयांचे फेरे मारण्याची आवश्यकता राहणार नाही.

अनेक शेतकऱ्यांच्या अडचणी या महसुली किंवा कागदोपत्री स्वरूपाच्या आहेत. त्या वेळेत दूर झाल्यास मोबदला वितरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण होऊ शकते. मात्र प्रकरणे न्यायालयात गेल्यास संबंधित रक्कम दीर्घकाळ प्रलंबित राहण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडून विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, न्यायिक आणि अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये अनेक स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. परिणामी अशा प्रकरणांचा अंतिम निपटारा होईपर्यंत संबंधित लाभार्थ्यांना मोबदला मिळण्यास विलंब होऊ शकतो. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना वेळेत लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने हा विशेष उपक्रम राबविला आहे.

या विशेष कॅम्पमध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी स्वतः उपस्थित राहून प्रकरणांचा आढावा घेणार असून आवश्यक त्या प्रकरणांमध्ये तातडीने निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देणार आहेत. प्रकल्पग्रस्तांनी सातबारा उतारा, आठ-अ, आधार कार्ड, पॅन कार्ड, वारस नोंदी, हक्कसोडपत्र, फेरफार अर्ज, न्यायालयीन कागदपत्रे तसेच इतर आवश्यक दस्तऐवजांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या सर्व प्रलंबित समस्या शक्य तितक्या वेगाने निकाली काढून त्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले.

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत येरवडा येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

■ **व्यसनमुक्त राहा, शिक्षणाला प्राधान्य द्या - समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे**

पुणे : दारु व अंमली पदार्थासह समाज माध्यमांचेही व्यसन घातक असून यामुळे विद्यार्थ्यांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, येत्या काळात भारत देशाला महासत्ता म्हणून उदयास येण्याकरिता तरुण पिढीसह विद्यार्थ्यांचे मोठे योगदान आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती करावी, असे आवाहन राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी यांनी केले.

नशामुक्त भारत अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय मादक पदार्थाचा गैरवापर व अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त सफाई कामगारांच्या मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, येरवडा येथे जनजागृती कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे उपस्थित होत्या. यावेळी प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिसन देवढे, सहायक आयुक्त (व्यसनमुक्ती) मिना आंबाडेकर तसेच डॉ. विजय मोरे यांच्यासह सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. वाढती व्यसनाधीनतेचे प्रमाण, त्याचे शारिरीक व आर्थिक दुष्परिणाम तसेच व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिशन देवढे यांनी दिली.

---

## छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिंहगडावर स्वच्छता मोहिम संपन्न

**पुणे :** छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीचे औचित्य साधून सारथी संस्थेच्यावतीने सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी तसेच सारथी पुणे विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मोहिमेदरम्यान किल्ल्यावरील प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. ऐतिहासिक वारशाचे जतन, गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत ऐतिहासिक व पर्यावरणीय संवर्धनासाठी योगदान देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सहभागी विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला, अशी माहिती सारथी विभागीय कार्यालयाच्यावतीने देण्यात आली आहे.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी घेतला आषाढीवारी तयारीचा आढावा

■ **पालखी सोहळा सर्वोत्कृष्ट होण्यासाठी समन्वयाने काम करा- मंत्री जयकुमार गोरे**

**पुणे** - आगामी आषाढी वारीमध्ये पालखीतील एकाही वारकऱ्याला असुविधा होता कामा नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश आहेत; त्यानुसार सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून पालखी सोहळा सर्वोत्कृष्ट पद्धतीने कसा होईल या दृष्टीने प्रयत्न करावे, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

आषाढीवारी निमित्त विधानभवन येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त शितल तेली- उगले, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सोलापूर जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे शहर विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. प्रशांत अमृतकर, अपर आयुक्त, सामान्य प्रशासन तुषार ठोंबरे आदी उपस्थित होते.

आषाढीवारीदरम्यान पाणी, शौचालये, स्वच्छता, आरोग्य सुविधा, मुक्कामाची चांगली व्यवस्था आदींची चोख व्यवस्था ठेवावी असे सांगून मंत्री गोरे म्हणाले, ग्रामविकास विभागाने पालखी सोहळ्यासाठी पहिल्यांदाच गतवर्षीपासून निधीची तरतूद ठेवण्यास सुरूवात केली.

## जिल्हा युवा पुरस्काराकरिता अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ चार वर्ष कालावधीचे युवक कल्याण क्षेत्रात युवा विकासाचे कार्य करणा-या युवांसाठी तसेच संस्थांसाठी जिल्हा स्तरावर पुरस्कार देण्यात येणार येणार असून पुरस्काराकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

जिल्हास्तर पुरस्काराचे स्वरूप जिल्हा युवा पुरस्कार जिल्हास्तरावर एक युवक,एक युवती तसेच एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येईल. युवक युवतींसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख १० हजार रुपये (प्रति युवक व युवतीसाठी) तसेच संस्थेसाठी पुरस्कार गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम ५० हजार रुपये याप्रमाणे आहे.

पात्रतेसाठी निकष वय १ एप्रिल रोजी १३ वर्षे व ३१ मार्च रोजी ३५ वर्षे पर्यंत असावे. जिल्हा पुरस्कारासाठी जिल्ह्यात सलग ५ वर्षे वास्तव्य असावे. पुरस्कार विभागून दिला जाणार नाही. मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही. कार्याचे सबळ पुरावे आवश्यक, पुरस्कार दिले नंतर दोन वर्ष क्रियाशिल राहणे आवश्यक राहील. संस्था नोंदणीकृत असावी किमान पाच वर्ष कार्यरत असणे आवश्यक आहे. संस्थाचे कार्य स्वयंस्फुर्तीने केलेले असावे.

पुरस्काराचे मुल्यांकन: युवा विकासाचे कार्य युवा व संस्थांनी १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत पुरस्कार वर्षालगत पुर्व गत तीन वर्षांची खालील बाबींची कामगिरी विचारात घेण्यात येते. युवा अथवा नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य, राज्याचे साधन संपत्ती जतन व संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग इ. बाबतचे कार्य, शिक्षण, प्रौढ शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय,महिला, सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण,व्यसनमुक्ती, तसेच युवांच्या सर्वांगिण विकासासाठी केलेले कार्य, राष्ट्रीय एकतेस प्रोत्साहन देणारे कार्य, नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या महिला सक्षमीकरण इ.बाबतचे कार्य, शेतक-यांच्या आत्महत्या इ. बाबतच्या समस्या, - साहस बाबतचे कार्य याप्रमाणे करण्यात येणार आहे.

जिल्हा युवा पुरस्काराकरिता जिल्ह्यातील युवक कल्याण क्षेत्रात काम करणा-या युवक, युवती व संस्थानी उमेदवारांनी मुलाखती व कार्याची पीपीटीव्दारे सादरीकरण केलेल्या कामाची सीडी आदी सबळ पुरावे पृष्ठांकन करून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

पुरस्कारांकरिता अर्ज ३० जून २०२६ अखेर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे, स.नं.१९१, विभागीय क्रीडा संकुल, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, मोझे हायस्कूल समोर, येरवडा, पुणे -४११००६ येथे कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावे. अर्जाचा विहित नमुना तसेच अधिक माहितीसाठी श्री. दादासाहेब देवकाते, क्रीडा अधिकारी ९९२३९०२७७७, श्री. शिवाजी कोळी, राज्य क्रीडा मार्गदर्शक ७०२०३३०४८८, श्रीमती. ज्योती सुयवंशी, क्रीडा अधिकारी ७७९८३०२४८१, श्रीमती. अश्विनी हत्तरगे, क्रीडा अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ७३८७८८०४२७ वर संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभागातर्फे २२ जूनपासून राज्यभर 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा'चे आयोजन- शेखर मुंदडा

- पशुसंवर्धन आयुक्तालय येथून होणार शुभारंभ
- १५ दिवसांत ६ हजार किमीचा प्रवास; ३५ जिल्ह्यांतील १ हजार गोशाळांचा सहभाग

**पुणे :** महाराष्ट्रातील देशी गोवंशाचे रक्षण, संवर्धन आणि गोशाळांना आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा' आयोजन करण्यात आली आहे. ही यात्रा २२ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात मार्गक्रमण करणार असून यात्रेचा शुभारंभ २२ जून रोजी सायंकाळी ४:३० वाजता पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष व यात्रा आयोजन समितीचे प्रमुख शेखर मुंदडा यांनी दिली. श्री. मुंदडा म्हणाले, संवाद यात्रा सलग १५ दिवस सुरू राहणार असून या दरम्यान सुमारे ६ हजार किलोमीटरचा प्रवास केला जाणार आहे. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांमध्ये या यात्रेचे संचालन होणार असून, यामध्ये राज्यातील १ हजाराहून अधिक गोशाळा प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. या संपूर्ण प्रवासात १५ हजारापेक्षा जास्त गोशाळा संचालक, गोरक्षक, गोपालक आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून विविध विषयांवर चर्चा केली जाईल.

**'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा'ची प्रमुख वैशिष्ट्ये व उद्देश:**

रासायनिक शेतीला पर्याय म्हणून देशी गायीच्या शेणावर आधारित नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे, राज्यातील गोशाळा केवळ देणग्यांवर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर कशा उभ्या राहू शकतील, याचे मार्गदर्शन करणे. गोबर आणि गोमूत्रापासून तयार होणाऱ्या सेंद्रिय खते, औषधे, दैनंदिन वापराच्या वस्तू आदी विविध मूल्यवर्धित उत्पादनांविषयी जनजागृती करणे, पशुसंवर्धन विभाग व गोसेवा आयोगाच्या विविध गोपालन व संसाधने विषयक योजनांची माहिती तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, आदी कार्य या यात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. गोशाळा संचालकांच्या आढावा बैठका घेणे, तसेच पशुसंवर्धन विभाग व गोशाळांमध्ये उत्तम समन्वय राहील यासाठी प्रयत्न करणे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून गोवंशाचे रक्षण करण्यासाठी पोलीस प्रशासन व स्थानिक गोरक्षकांमध्ये सलोख्याचा समन्वय साधणे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायद्याचा प्रचार करून कायदेशीर बाबींविषयी समाजाला अवगत करणे. स्थानिक देशी गोवंशाच्या पालन-पोषणा संदर्भात वैज्ञानिक व पारंपरिक पद्धतींची माहिती देऊन जनजागृती करण्यात येणार आहे.

# बुलेट ट्रेनने मुंबई-पुणे ४८ मिनिटांत; महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे केंद्र बनवणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- **जबिलच्या रांजणगाव येथील अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाचे उद्घाटन; इलेक्ट्रॉनिक्स, डेटा सेंटर आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर**

पुणे, दि. १७ : मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे दोन्ही शहरांतील प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत होणार असून मुंबई आणि पुणे हे एकात्मिक आर्थिक क्षेत्र म्हणून विकसित होतील. तसेच जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडून महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील जबिल कंपनीच्या अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, आमदार दिलीप वळसे पाटील, ज्ञानेश्वर कटके, राज्याचे उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, जॅबिलचे कार्यकारी उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अँडी प्रिस्टली, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र देशातील डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून भारतातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता राज्यात विकसित होत आहे. त्यामुळे डेटा सेंटर, डीप टेक, इलेक्ट्रॉनिक्स आणि चिप उत्पादनाशी संबंधित संपूर्ण उद्योग परिसंस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले. इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीमध्ये महाराष्ट्राने अग्रस्थान मिळविल्याचे नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्र सरकारने राज्याला दिलेल्या इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरमुळे उद्योग क्षेत्राला नवी गती मिळणार आहे. यावेळी त्यांनी जेएनपीटी आणि उभारणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या वाढवण बंदराला समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमोर मांडल्याची माहिती दिली. हा कॉरिडॉर जालना, वर्धा येथील ड्राय पोर्ट आणि पुढे गडचिरोलीपर्यंत जोडला जाणार असून त्यामुळे लॉजिस्टिक्सचा खर्च ७ ते ८ टक्क्यांपर्यंत कमी होईल. यामुळे महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील प्रभावी केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत राज्यातील आदर्श गावांची मंगळवारपासून पडताळणी मोहीम

**पुणे :** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांमधील ७४१ गावांची केंद्र शासनाने निवड केली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २३ जून ते २५ जून २०२६ या कालावधीमध्ये या गावांमध्ये विशेष ग्रामसभा व आदर्श गावांची संयुक्त पडताळणी मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी कळविली आहे.

या मोहिमेद्वारे 'प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजनेची' (पीएम- अजय) जनजागृती करावयाची असून, गावाच्या विकासात्मक गरजांची ओळख, गावांचे ग्राम विकास आराखडे तयार करणे, त्यास ग्रामसभेमध्ये मंजुरी देणे, ज्या गावांचे ग्राम विकास आराखडे तयार केलेले आहेत, त्या आराखड्यांना जिल्हास्तरीय समितीची अंतिम मान्यता देणे, आदी कामकाज करण्यात येणार आहे. त्याशिवाय गावांचे ७० किंवा त्यापेक्षा जास्त गुणांकन असलेल्या गावांना आदर्श ग्राम घोषित करणे, 'आदर्श ग्राम' म्हणून घोषित करण्यात आलेल्या गावांमध्ये केंद्र-राज्य शासनाच्या विविध योजनांशी समन्वय साधण्यावर भर देण्याच्या अनुषंगाने उपाययोजनांवर कार्यवाही करण्यात येणार आहे. या गावांमध्ये ५० सामाजिक-आर्थिक निर्देशकांचे आणि १५ ग्रामीण पायाभूत सुविधांचे निकष परिपूर्णतेबाबत माहिती घेऊन त्याबाबत ग्रामसभेमध्ये सल्लामसलत करून त्या गावासाठी आवश्यक असणाऱ्या विकास कामकाजासाठी १० लाख रुपयांच्या पुढील मागणी प्रस्तावित करणे आदी कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, आदर्श गावांची संयुक्त पडताळणी करून तपासणी अहवाल 'पीएम- अजय' मोबाईल ॲपद्वारे व्हिलेज इन्स्पेक्शन रिपोर्ट मध्ये भरावयाचा आहे.

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा २४ जून रोजी आयोजन

**पुणे :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे आणि क्रांतिवीर लायन हार्टेड होनाजी भागुजी केंगले शासकीय औद्योगिक संस्था (आयटीआय) घोडेगाव (ता. आंबेगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने सदर आयटीआय येथे येत्या २४ जून रोजी सकाळी १० वाजता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात आंबेगाव तालुक्यातील औद्योगिक परिसरातील १० उद्योजक सहभागी होणार असून, ३०५ हून अधिक रिक्त पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. फिटर, वेल्डर, टुल न्ड डाय मेकर, शिट मेकर, मशिन ऑपरेटर, ग्राइंडर, क्वालिटी इंजिनिअर, क्वालिटी इन्स्पेक्टर, पॅकिंग तसेच ट्रेनी अशा विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांच्या माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज करावा. तसेच २४ जून रोजी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती व बायोडाटा (रेझ्युम) सोबत घेऊन मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'विकसित भारत जी राम जी' अधिनियमाला जाणून घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अभियानाचा लाभ घेण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे आवाहन

**पुणे :** 'विकसित भारत जी राम जी' अधिनियमाच्या तरतुदी, लाभ, कायदेशीर बळकटी, ग्रामस्थांचे अधिकार व कर्तव्ये आदींच्या अनुषंगाने प्रचार व प्रसिद्धी अभियान राबविण्यात येत असून २२ जूनपासून ग्रामस्तर ते तालुका व जिल्हा स्तरापर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात सक्रीय सहभाग घेऊन अधिनियमाची सविस्तर माहिती व उपलब्ध लाभांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

श्री. डूडी म्हणाले, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, ग्रामपंचायत पदाधिकारी, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, स्वयं-सहाय्यता गट, युवक मंडळे, आशा सेविका, महिला बचत गट, शेतकरी, मनरेगा कामगार व नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. 'विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम, २०२५ विषयी सविस्तर माहिती जाणून घेण्याची ही संधी आहे. श्री. डुडी म्हणाले, ग्रामीण विकास व ग्रामस्वराज्याच्या बळकटीकरणासाठी भारत सरकारने सद्यस्थितीत अस्तीत्वात असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम ऐवजी विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम, २०२५ लागू केला आहे. या अधिनियमाचा उद्देश ग्रामीण कुटुंबांना रोजगाराची वैधानिक हमी प्रदान करणे, शाश्वत ग्रामीण मालमत्ता निर्माण करणे, स्थानिक विकासाला चालना देणे तसेच विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करणे हा आहे. ग्रामपंचायतींना विकास नियोजनामध्ये अधिक सक्षम भूमिका प्रदान करण्यात आली आहे.

# वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**पुणे :** वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे, या योजनांचा लाभ घेण्याकरिता इच्छुकांनी https://vnvjntdc.org/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार, राजे उमाजी नाईक, परमपुज्य गंगानाथ महाराज, ब्रम्हलीन आचार्य दिव्यानंद पुरीजी, श्रीकृष्ण आणि विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) अंतर्गत बीज भांडवल कर्ज योजना, एक लाख रूपये थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना राबवून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. व्याज परतावा योजनेत संपूर्ण कर्ज बँकेचे राहणार आहे. तथापि कर्जाचे हप्ते नियमितपणे भरल्यास कमाल १२ टक्क्यापर्यंतचे व्याज लाभार्थीचा बँक खात्यावर महामंडळाच्यावतीने जमा करण्यात येणार आहे. एक लाख थेट कर्ज योजनेमध्ये संपूर्ण कर्ज महामंडळाकडून दिले जाणार आहे. लाभार्थीने २ हजार ८५ रुपायांचा नियमितपणे ४८ समान मासिक हप्त्यामध्ये परतफेड केल्यास लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही, परंतु थकित हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल.

# टपाल विभागाची पेंशन अदालत २८ जुलै रोजी आयोजन

**पुणे :** पोस्टमास्तर जनरल कार्यालयाच्यावतीने टपाल विभागातील निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी पेंशन अदालत आयोजित करण्यात आली आहे. ही अदालत २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता पोस्टमास्टर जनरल कार्यालय, पुणे क्षेत्र येथे होणार आहे.

टपाल विभागातून निवृत्त झालेल्या किंवा सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनाशी संबंधित तक्रारींचा या अदालतमध्ये विचार केला जाणार आहे. विशेषतः, पुणे क्षेत्रातील अशा प्रकरणांचा समावेश होईल ज्यांचे तीन महिन्यांच्या आत निपटारा झालेला नाही. तथापि, उत्तराधिकार, धोरणात्मक बाबी किंवा नितीशी संबंधित प्रकरणांवर या पेंशन अदालतमध्ये विचार केला जाणार नाही. इच्छुक निवृत्तिवेतनधारकांनी आपले अर्ज निर्धारित नमुन्यात ३ जुलै २०२६ पूर्वी खालील पत्त्यावर पाठवावेत. वरिष्ठ लेखा अधिकारी, पोस्टमास्टर जनरलचे कार्यालय, पुणे क्षेत्र, ४ फायनान्स रोड, पुणे जी.पी.ओ. जवळ, साधुवासवानी चौक, पुणे- ४११००१ अर्जांचा पेंशन अदालतमध्ये विचार केला जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोरपणे व्यवस्थापन करण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे निर्देश

**पुणे :** पुणे शहरासाठी महत्त्वाच्या खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण समूहात उपलब्ध ४.१३ टीएमसी आणि पवना धरणातील १.६५ टीएमसी पाणीसाठ्याचे अत्यंत काटेकोरपणे व्यवस्थापन करावे, कोणत्याही परिस्थितीत पुणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आवश्यक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

पर्जन्यमान विश्लेषण, धरणातील पाणीसाठ्याचा आणि पाणीवापराचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. डुडी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते, कार्यकारी अभियंता राजेंद्र डुबल, किरण देशमुख यांच्यासह इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण समूहाची जिवंत साठा क्षमता २९.१५ टीएमसी असून ४.१३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच पवना धरणामध्ये १.६५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्राच्या दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या अंदाजित अनुक्रमे ४ व १.५ टीएमसी पिण्याच्या पाण्याच्या गरजेनुसार योग्य नियोजन करावे, असे ते म्हणाले.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व अन्य पाणी वापर वापरकर्त्या संस्थांनी उपलब्ध साठा व आगामी गरजा लक्षात घेऊन पाणी वापराचे पुनर्नियोजन करावे. धरणे, कालवे, नद्या व इतर जलस्रोतांमधील अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस व जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबवावी. सर्व संबंधित विभागांनी जलसाठा, पर्जन्यमान, आवक व पाणी वापराचा साप्ताहिक आढावा घेऊन त्याचा अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करावा, असे श्री. डुडी यांनी सांगितले.